जुना घाव ओला

नवा घाव खोल

व्यथांचे प्रपंचाशी

नातेच फोल !

जुनी तक्तपोशी

नवी रोजनीशी

हिशोबी दिनांकाचा

चुकतोच मेळ !

जुनी शुध्दीमत्ता

नवी बुध्दीमत्ता

धीराच्या प्रसंगीच

जातोच तोल !

जुनी नव नवेली

नवे नव्य ल्याली

तमाच्या प्रकाशीच

विझण्याचा खेळ !

*: जिगीषा*